## संक्षिप्त वृत्त

### महेश मांजरेकरांच्या हस्ते 'चांदवा' प्रकाशित

✔ **मुंबई** : स्टारक्राफ्ट मनोरंजन प्रस्तुत 'चांदवा' या मराठी म्युझिक अल्बमचे प्रकाशन नुकतेच ज्येष्ठ दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या उपस्थितीत फिल्मसिटीच्या बॉलीवूड थीमपार्क मध्ये झाले.'चांदवा' या नव्या अल्बमला आघाडीचा तरुण गायक स्वप्नील बांदोडकर आणि प्रथमच व्यावसायिक गायिका म्हणून पदार्पण करणाऱ्या श्रेया भारतीय यांचा स्वरसाज लाभला आहे.संतोष मिजगर आणि प्रणाली मेने हे कलाकार या अल्बम मध्ये दिसणार आहेत.विशेष म्हणजे 'चांदवा'अल्बमचे निर्माते संतोष मिजगर यांनी चित्रनगरी मधील बॉलीवूड थीमपार्क सर्वसामान्यांसाठी खुलं केलं आहे.

### मोबिल१ ब्रँडच्या ५० वर्षांच्या इतिहासाचे स्मरण करेल

✔ **मुंबई** : जागतिक बाजारपेठेत मोबिल१ मोटर तेल सादर केल्याचा ५० वा वर्धापन दिन साजरा करताना एक्झॉनमोबिल ला अभिमान आहे. २०२४ मध्ये, एक्झॉनमोबिल त्याच्या मोबिल१ ब्रँडच्या ५० वर्षांच्या इतिहासाचे स्मरण करेल भागीदारी, मोटरस्पोर्ट्स आणि व्हर्च्युअल रियॅलिटी या सर्व उपक्रमांच्या मालिकेसह, यापैकी प्रत्येक ब्रँडचा वारसा आणि पुढे काय आहे यावर प्रकाश टाकेल.लॉरा बस्टर्ड, मोबिल१ च्या ग्लोबल ब्रँड मॅनेजर, म्हणाल्या,५० वर्षांपूर्वीच्या स्थापनेपासून, मोबिल१ मोटर ऑइलने गुणवत्ता आणि कार्यक्षमतेसाठी सातत्याने मानक सेट केले आहेत आणि पुढील ५० वर्षांपर्यंत ते सुधारणे आणि उत्कृष्ट बनवणे सुरू ठेवेल.

### छोट्या चित्रकारांना दिले अभिव्यक्तीचे व्यासपीठ

✔ **मुंबई** : नवनीत एज्युकेशनच्या युवा स्टेशनरीला 'युवा मास्टरस्ट्रोक' ची यशस्वी सांगता झाल्याचे जाहीर करताना अत्यंत अभिमान वाटत आहे.ही स्पर्धात भारतातील विविध राज्यांमध्ये आयोजित करण्यात आली होती.व छोट्या चित्रकारांना अभिव्यक्तीचे व्यासपीठ दिले.या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून मुलांना चित्रकलेतून त्यांची कल्पकता उलगडण्यासाठी सक्षम करण्यात येते.या स्पर्धेला तब्बल दोन दशकांचा वारसा असून या आयकॉनिक स्पर्धेचा या वर्षी २०वा वर्धापन दिन होता.२०२३च्या पर्वापासून या स्पर्धेमध्ये २२ राज्यांमधील तब्बल ५२५१ शाळांनी या स्पर्धेत सहभागल नोंदवला आणि सुमारे १३.६ लाख विद्यार्थ्यांनी आपले कलागुण आणि कल्पनाशक्तीचे प्रदर्शन केले.अभिजीत सान्याल म्हणाले.ते पुढे म्हणाले,या स्पर्धेमध्ये लहान कलाकारांना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्यासाठी व्यासपीठ मिळतेच, त्याचप्रमाणे कलात्मक अभिव्यक्ती आणि रसग्रहणाच्या संस्कृतीला चालना मिळते.

# घरात अन् पारावर केवळ 'राजकारण'

## उन्हाबरोबरच राजकारणाने वातावरणात गरमाई

✔ **चिखली/प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. गावागावात राजकारण तापू लागले आहे. निवडणुकीचा रंग चढायला सुरुवात झाली. कार्यकर्तेही सज्ज झाले आहेत.

मोहोळ शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात चौकाचौकांत, कट्ट्याकट्ट्यांवर पारावरही सर्वत्र निवडणुकीची चर्चा रंगत आहे.



'मतदारसंघात उमेदवार कोणीही असो, सगळीकडे सारखीच स्थिती असते', 'कोणीबी निवडून येवो, पळसाला पाने तीनच' अशी कुजबूज मतदारांमध्ये सुरु आहे. निवडणुकीच्या आखाड्यातील उमेदवारांची घोषणा झाल्याने आता नव्याने रंग भरणार आहे. उमेदवार आर या पारचा पवित्रा घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

निवडणुकीचा आखाडा अद्याप म्हणावा तसा तापला नसला, तरी लोकसभा निवडणुकीत बदललेली राजकीय समीकरणे, आरोप-प्रत्यारोपांमुळे ग्रामीण भागातील सुध्दा वातावरण ढवळून निघणार आहे. कार्यकर्त्यांनी आयुधे सज्ज केली आहेत..

**कडक उन्हामुळे कार्यकर्त्यांना घाम**

ऐन उन्हाळ्यात लोकसभा निवडणुका होत असल्यामुळे विविध पक्षांच्या उमेदवारांपुढे मतदारांपर्यंत पोहोचण्याचे मोठे आव्हान आहे. प्रचार करताना उमेदवारांना चांगलाच घाम फुटत आहे. प्रखर उन्हाच्या तडाख्यामुळे प्रचाराला फटका बसत आहे. उमेदवार व कार्यकर्ते सकाळच्या वेळी, तसेच दुपारनंतर प्रचार करताना दिसत आहेत. काही जण खांद्यावर दुपट्टा टाकून फिरत आहेत.

# भाजपामध्ये कुर्डुवाडीत राजीनामासत्र

## मोहिते-पाटील यांचे काम करणार

✔ **कुर्डूवाडी/प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीनिमित्ताने माढा लोकसभा मतदारसंघात घडत असलेल्या नाट्यपूर्ण घडामोडी घडत आहेत. रविवारी (दि.१४) भाजपा शहर व्यापारी सेलचे अध्यक्ष सागर शर्मा यांच्यासह अनेकांनी भाजपाचा राजीनामा दिला.

माढा मतदारसंघाच्या उमेदवारीवरुन नाराज अकलूजचे धैर्यशील मोहिते पाटील यांनी भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा देताच भाजपाचे विद्यमान खासदार तथा उमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांच्या निष्क्रियतेच्या निषेधार्थ भाजपा शहराध्यक्ष शंकर बागल यांनी आपल्या पदाचा राजीनामा तालुकाध्यक्ष योगेश बोबडे यांच्याकडे सोपवला. इथेच हे राजीनामा सत्र न संपता दुसऱ्या दिवशी रविवारही सुरु राहिले. रविवारी सागर शर्मा यांच्यासह भाजपा युवती मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अनिसा शेख, भाजपा पंचायतराज व ग्रामविकास विभाग शहराध्यक्ष सचिन गायकवाड आदींनी आपल्या सर्व पदांचा राजीनामा वरिष्ठांकडे दिला आहे.

आम्ही भाजपा प्रदेश कार्यालयाच्या वतीने वेळोवेळी ज्या सूचना येत होत्या त्याचे पालन करुन विविध कमिटीची नेमणूक केलेली आहे . विद्यमान खासदारांनी कुर्डुवाडी शहरातील रेल्वेच्या प्रश्नासाठी दुर्लक्ष केलेले आहे. चिंकहिल येथील आरपीएफ ट्रेनिंग सेंटर बंद पडल्याने एक हजार लोकांचा कुर्डुवाडी बाजारपेठेत मिळणारा रोजगार बंद पडला. कुर्डुवाडी येथील रेल्वे गेटवर उड्डाणपूल न केल्यामुळे शहराचे दोन भाग झाले आहेत. तसेच येथील रेल्वेचा डबे दुरुस्तीच्या कारखान्याला निधीही उपलब्ध करून दिलेला नाही. सोलापूरला सकाळी जाण्यासाठी कुर्डुवाडी जेऊर माढा या स्थानकावरून एकही रेल्वे सुरु केली गेली नाही. यासाठी प्रवासी मागणी करून थकून गेले आहेत. खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी कुठलाही प्रश्न न सोडवल्या मुळे आपल्या पदाचे राजीनामे दिलेले आहेत, असे त्यांनी राजीनामा पत्रात म्हटले आहे.

> 'आम्ही भाजपाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला आहे. तुर्त तरी कोणत्या पक्षात प्रवेश नाही. पण काम मात्र धैर्यशील मोहिते-पाटील यांचे करणार.
>
> **- शंकर बागल**

# टेंभुर्णी येथे घरातून रकमेसह साडेपाच लाखाचे दागिने लंपास

✔ **सोलापूर/प्रतिनिधी**

घराच्या दरवाजा पुढे करून अंगणात झोपल्याची संधी साधून चोरट्यांनी घरात प्रवेश करून कपाटातील रोख रकमेसह ५ लाख ४५ हजार रुपये किमतीचे दागिने पळवले. ही चोरी टेंभुर्णी (ता.माढा) येथील झिरपेवस्तीत शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली.

या संदर्भात नानासाहेब बबन देशमुख (वय ४६ रा.झिरपेवस्ती, टेंभुर्णी) यांनी टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दोघा चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नानासाहेब देशमुख हे घराचा दरवाजा पुढे करून अंगणात झोपले होते. पहाटे दीड वाजेच्या सुमारास चोरट्याने घरात प्रवेश करून कपाटातील ६५ ग्रॅम सोन्याचे दागिने, १ लाख रुपये रोख आणि चांदीचे वस्तु असा ऐवज लंपास केला.

त्यानंतर त्यांच्या घराशेजारी त्यांचे बंधू दादासाहेब देशमुख यांच्या कपाटातील १० हजार रुपये चोरून नेले. चोरी केल्यानंतर पळून जाताना दोघा चोरट्यांना काही जणांनी पाहिले, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास फौजदार सोनटक्के करीत आहेत.

# शहरात दुचाकी चोरीचे सत्र सुरूच

## टोळी सक्रीय? दोन दूचाकी चोरट्यांनी पळविल्या

✔ **सोलापूर/प्रतिनिधी**

शहरातून चोरट्यांकडून नागरिकांची वाहने लंपास करण्याचे सत्र सुरूच आहे. दोन पोलीस ठाण्याच्या हद्दीतुन एकाच दिवशी दोन दुचाकी चोरट्यांनी चोरून नेल्या आहेत.दुचाकी चोरीच्या वाढत्या घटनांमुळे चोरट्याची टोळी सक्रीय झाल्याचे बोलले जात आहे.

भवानी पेठ येथील सोमानी प्लॉट येथे सुशांत चंद्रकांत लोखंडे यांच्या घरासमोर हॅन्डल करून ठेवलेली १ लाख रूपये किंमतीची एम एच १३ डी जे ७०७० या क्रमांकाची दूचाकी चोरट्याने हातोहात पळवून नेली. याप्रकरणी सुशांत लोखंडे यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिस हेड कॉन्सटेबल पैकेकरी तपास करीत आहेत. दुसऱ्या घटनेत रेल्वे स्टेशनसमोर उभी केलेली नागेश लक्ष्मण रोठडा (वय २५ रा.हारपद नगर,एम आय डी सी) यांची च्या ३५ हजार रूपये किंमतीची दुचाकी क्र. एम एच १३ डी जे ४००९ ही शनिवारी (दि.१३) सकाळी सहा ते साडे सहाच्या दरम्यान चोरट्याने चोरली. याप्रकरणी नागेश रोठडा यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हेड कॉन्सटेबल पापडे तपास करीत आहेत.

**सव्वा लाखांच्या दुचाकींची चोरी**

दोन घटनामध्ये एकुण १ लाख ३५ हजार रूपये किंमतीच्या दुचाकी शहराच्या मध्यवर्ती भागातुन चोरून नेल्या आहेत. शहरात दररोज एका पोलीस ठाण्यात दुचाकी चोरी तसेच अन्य चोरीच्या घटना झाल्याची नोंद पोलिस दफ्तरी असते. त्यामुळे नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.




बचेरी येथील माने - बरकडेवस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा.

# बरकडेवस्ती जि.प. प्राथमिक शाळा झाली डिजीटल

## अध्यक्ष, उपाध्यक्षांसह लोकसहभागातून काम

✔ **पिलीव/प्रतिनिधी**

बचेरी (ता.माळशिरस) येथील माने - बरकडेवस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोकसहभागातून व अध्यक्ष शंकर गोरड व उपाध्यक्ष तातोबा सुळे यांच्या विशेष प्रयत्नातुन डिजीटल झाली.

शाळेचे मुख्याध्यापक जगदीश गोडसे, मेनकुदळे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य दत्ता लकडे, जयराम बरकडे, अप्पा बरकडे, सचिन लकडे, समाधान लकडे, हनुमंत माने, सत्यवान खरात, सागर खांडेकर या सर्वांच्या सहकार्याने शाळेचा चेहरा मोहरा बदलला आहे. वर्गात संगणक, खेळाचे साहित्य, ग्रामपंचायतीच्या वतीने पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र सुविधा, सुसज्ज मैदान, मुलांसाठी झोपाळा, घसरगुंडी आदी सोई सुविधा शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, पालक व ग्रामस्थ यांच्या सहकार्याने उपलब्ध करुन दिल्या आहेत. सुधारणांमुळे खेडेगावातील ही शाळा चांगल्या इंग्लिश माध्यमाच्या शाळेला मागे टाकीत आहे. यासाठी विद्यमान सरपंच राणी गोरड, माजी उपसरपंच सुदाम शिंदे, माजी अध्यक्ष आप्पासो बरकडे, तंटामुक्तीचे अध्यक्ष बिरा शिंदे, दत्ता लकडे, ज्ञानेश्वर माने यांचे आर्थीक तसेच इतर सहकार्य लाभले.

मुख्याध्यापक जगदीश गोडसे व सहशिक्षीका मेनकुदळे यांचे गुणवत्तापुर्ण मार्गदर्शन लाभत आहे. सुधारणांमुळे शाळेची दिवसेदिवस चांगली प्रगती होत आहे.

# अक्कलकोट शहर, तालुक्यात डॉ. आंबेडकरांना अभिवादन

✔ **अक्कलकोट/प्रतिनिधी**



अक्कलकोट शहर तालुक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी झाली. विविध संस्था, कार्यालय, शाळा, महाविद्यालय येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

प्रज्ञावृक्ष मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने बसस्थानकाजवळ अध्यक्ष गौतम सोनकांबळे यांच्या नेतृवाखाली प्रतिमेची प्रतिष्ठापना व पुजन करण्यात आले. यावेळी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती गोगांव अजित गायकवाड यांच्या वतीने वही, पेन व खाऊ वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी सरपंच संघटना तालुकाध्यक्ष प्रदीप जगताप हे होते. प्रतिमा पूजन कल्लप्पा बनसोडे व डॉ लिंगराज नडगेरी यांच्या हस्ते करण्यात आले. वही व शालेय साहित्य वाटप उपसरपंच कमलाकर सोनकांबळे व शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. खाऊ वाटप पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, आशा सेविका मधुमती गायकवाड, आरोग्यसेविका अंबिका वळसंग यांनी केले.

गोगाव ग्रामपंचायत येथे प्रतिमा पूजन नबिलाल नदाफ व बसवराज आलूरे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर गोगांव येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शरणपा कलशेट्टी हे होते. विजयनगर येथे शिवसेना जिल्हाप्रमुख रविना राठोड यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पदाधिकाऱ्यांसह शिवसैनिक उपस्थित होते. सी.बी.खेडगी महाविद्यालयात चेअरमन बसलिंगप्पा खेडगी यांच्या मार्गदर्शनातून जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. शिवराय अडवितोट यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. गणपतराव कलशेट्टी यांनी प्रास्ताविक केले. श्री फत्तेसिंह शिक्षण संस्था येथे संस्थेच्या कार्यालयातही जयंती साजरी झाली. बॅगेहळ्ळी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतही प्रतिमेचे पुजन राजश्री झिंगाडे यांनी केले. विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मुलींनी भीम गीताचे सादरीकरण केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे रेखाचित्र रंगभरण स्पर्धा घेण्यात आली.

# दोन्ही उमेदवारांच्या भेटीमुळे एम.के.फाउंडेशनच्या कार्यकर्त्यात उत्साह

## आ. रात सातपुते यांनीही भेट घेऊन केली निवडणुकीबाबत चर्चा

✔ **दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर लोकसभेच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांच्या पाठोपाठ आता भाजपा व मित्र पक्षाचे उमेदवार आ. राम सातपुते यांनी एम.के. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांची भेट घेऊन निवडणूकीसंदर्भात चर्चा केली. त्यामुळे एम.के.फाउंडेशनच्या कार्यकर्त्यात उत्साहाचे वातावरण आहे.

लोकसभेचे दोन्ही उमेदवार महादेव कोगनुरे यांनी स्वत: हून कोगनूरे यांची भेट घेतली. पक्ष कोणताही असो आपली दखल घेतली जात असल्याचे समजताच एम.के.फाउंडेशनच्या कार्यकर्त्यात उत्साहा संचारला आहे. महादेव कोगनुरे यांच्या सामाजिक कार्यामुळे जिल्ह्यात दांडगा जनसंपर्क वाढला आहे. त्यातच महादेव कोगनुरे यांनी आपली राजकिय भुमिका अजूनही जाहीर न केल्याने आता सर्वच पक्षाचे नेते महादेव कोगनुरे यांची दखल घेताना दिसून येत आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून महादेव कोगनुरे हे एम.के.फाउंडेशनच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यात नि:स्वार्थ भावनेने जनसामान्यांची सेवा करीत आहेत. यामुळेच महादेव कोगनुरे यांना जनसामान्यांच्या ह्रदयात स्थान मिळताना दिसून येत आहे. यापुढे महादेव कोगनुरे यांनीही राजकारणात राहून समाजकार्य करीत जनसामान्यांच्या सेवेला प्राधान्य देणाऱ्या पक्षाला साथ देण्याची भुमिका घेतल्याचे बोलले जात आहे. परिणामी सध्या विविध पक्षाचे नेते त्यांच्या संपर्कात येताना दिसतात. महायुती आणि महाविकास आघाडीच्या लोकसभेचे उमेदवारांनी आता महादेव कोगनुरे यांची भेट घेतल्याने कोगनुरे काय भुमिका घेणार याची उत्सुकता कार्यकर्त्यांना लागली आहे.



**महादेव कोगनुरेंच्या भुमिकेकडे सर्वांचे लक्ष**

सामाजिक कार्याच्या जोरावर महादेव कोगनुरे यांनी दक्षिण सोलापूर तालुक्याची खिंड लढवण्यासाठी एम.के.फाउंडेशनची सेना सध्या सज्ज झाल्याचे बोलले जात आहे. शांत, संयमी व सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व लाभलेले महादेव कोगनुरे यांचे नेतृत्व सध्या सर्वांना हवेहवेसे वाटत आहे. यामुळेच महादेवांच्या राजकीय भुमिकेकडे सर्वांच्या नजरा लागून राहिल्या आहेत.

# युवकाच्या पाठीत चाकूने वार

✔ **सोलापूर/प्रतिनिधी**

तू, माझ्या भाच्यासोबत का फिरतो, असा जाब विचारत १७ वर्षीय युवकाच्या पाठीत चाकूने वार करण्यात आला. ही घटना येथील पेंटर चौकात शुक्रवारी (दि.१२) घडली. फैसल अलीम दीदवान (वय- १७ वर्षे) असं जखमी युवकाचं नांव आहे. त्याच्या फिर्यादीनुसार जेलरोड पोलिसांनी बाकी कुरेशी याच्यासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फैजल पेंटर चौकातून जात असताना बाकी कुरेशीने पूर्वीच्या तक्रारीचा रोष मनात धरून, तू माझ्या भाच्याबरोबर का फिरतोस असे म्हणत पाठीवर चाकूने वार केला.

अजिज कुरेशीने त्याचा गळा आवळून मारहाण केली. लतीफ कुरेशी याने म्हणत शिवीगाळ केली.या प्रकरणी बाकी कुरेशी, अजिज कुरेशी आणि लतिफ कुरेशी या तिघांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हेड कॉनस्टेबल सोनार तपास करीत आहेत.

# पेड न्यूजवर करडी नजर

## मृण्मय बसाक; जिल्हास्तरीय माध्यम प्रामाणिकरण व संनियंत्रण समितीला भेट

✔ **सोलापूर/प्रतिनिधी**

निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समिती (एमसीएमसी) कार्यान्वित केली आहे. समितीने निर्भय व निष्पक्ष पदधतीने मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसारित होणाऱ्या पेड न्यूजसह सोशल मिडीयाच्या वापरावरही करडी नजर ठेवण्याचे निर्देश माढा लोकसभेचे निवडणूक खर्च निरीक्षक मृण्मय बसाक यांनी दिले.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मृण्मय बसाक यांनी रविवारी (दि.१४) जिल्हा माध्यम कक्षास भेट दिली. यावेळी त्यांनी ही सुचना केली. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, श्रीराम राऊत, रफिक शेख, खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी किरण गायकवाड, खर्च समितीचे नोडल अधिकारी रुपाली कोळी, सहायक खर्च समितीचे वैभव राऊत आदी उपस्थित होते.

अंबादास यादव व गणेश बिराजदार यांनी पेड न्यूज कात्रणे आणि दैनंदिन निवडणूक कार्यालयाला देण्यात येणाऱ्या अहवालाविषयी माहिती दिली. राजकीय पक्षांना पेड न्यूज व जाहिरात पूर्वप्रमाणीकरण याची माहिती देण्यात आल्याची माहिती समिती सदस्य सचिव सोनटक्के यांनी दिली. यावेळी लेखा अधिकारी सरताज शेख, माढा खर्च नियंत्रण कक्षाचे डॉ अर्चना कसबेकर, माध्यम कक्षातील शरद नलावडे, दिलीप कोकाटे, संजय घोडके, आप्पा सरवळे, धुळाप्पा जोकार आदी उपस्थित होते.



**इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरातीवर नियंत्रणासाठी समिती**

इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरातीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थापित टीव्ही युनिटच्या कामकाजाची माहिती युनिटचे प्रमुख रफिक शेख यांनी सविस्तर दिली. डॉ. श्रीराम राऊत यांनी सोशल मिडिया विषयी माहिती दिली.